# नोंदणी व मुद्रांक विभाग
# नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
### तळमजला, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवनासमोर, पुणे ४११ ००१

## जाहिरात क्रमांक - 01/2025

महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई (गट-ड) संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांकडून केवळ ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावयाची सुविधा https://ibpsonline.ibps.in/igrcsfeb25 या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या https://rfd.maharashtra.gov.in आणि नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्या https://igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळांवर दिनांक- 22/04/2025 पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

### वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यवाहीचा टप्पा | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | ऑनलाइन अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक-22/04/2025 पासून ते दिनांक-10/05/2025 रोजी 23.59 वाजेपर्यंत. |
| 2 | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | https://igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल, तसेच उमेदवारास प्रवेशपत्राव्दारे कळविण्यात येईल. |

- **आवश्यकतेनुसार परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतचा तपशील संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.**
- **रिक्त पदांचा तपशील**

| पदाचे नाव | संवर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|
| शिपाई | गट - ड | एस-01, रु.15000-47600 अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते. | 284 |

### सामाजिक व समांतर आरक्षण तक्ता

- **शासनाने नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागातील 284 शिपाई सवंर्गातील पदे भरण्याकरिता मान्यता प्रदान केलेली आहे.**
- वर नमूद केल्यानुसार सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन तसेच शासन निर्णय दिनांक-27/02/2024 मधील परिशिष्ट ब मध्ये दिलेल्या सूचना नुसार सदर सरळसेवेव्दारे भरावयाच्या 284 पदांचा प्रवर्गनिहाय व समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालील प्रमाणे-

| अ. क्र. | प्रवर्ग आरक्षण | एकुण रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सर्व साधारण | महिला (30%) | माजी सैनिक (15%) | दिव्यांग (4%) | प्रावीण्य प्राप्त खेळाडू (5%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | भूकंपग्रस्त (2%) | पदवीधर अंशकालीन (10%) | अनाथ (1%) | |
| 1 | 2 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 1 | अनुसूचित जाती | 29 | 10 | 9 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 20 |
| 2 | अनुसूचित जमाती | 13 | 4 | 4 | 2 | | 1 | 1 | 0 | 1 | | 13 |
| 3 | विमुक्त जाती (अ) | 7 | 3 | 2 | 1 | | 0 | 0 | 0 | 1 | | 7 |
| 4 | भटक्या जमाती (ब) | 0 | 0 | 0 | 0 | | 0 | 0 | 0 | 0 | | 0 |
| 5 | भटक्या जमाती (क) | 11 | 3 | 3 | 2 | | 1 | 1 | 0 | 1 | | 11 |
| 6 | भटक्या जमाती (ड) | 10 | 2 | 3 | 2 | एकूण 11 पदे | 1 | 1 | 0 | 1 | एकूण 2 पदे | 10 |
| 7 | विशेष मागास प्रवर्ग | 5 | 1 | 2 | 1 | | 0 | 0 | 0 | 1 | | 5 |
| 8 | इतर मागास प्रवर्ग | 62 | 21 | 19 | 9 | | 3 | 3 | 1 | 6 | | 62 |
| 9 | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | 28 | 10 | 8 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 28 |
| 10 | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (SEBC) | 28 | 10 | 8 | 4 | | 1 | 1 | 1 | 3 | | 28 |
| 11 | अराखीव (खुला) | 91 | 29 | 27 | 14 | | 5 | 5 | 2 | 9 | | 91 |
| | एकूण | 284 | 93 | 85 | 43 | 0 | 14 | 14 | 6 | 29 | 0 | 284 |

**टीप** - 1. मा. विभागीय आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडुन बिंदुनामावली नोंदवहीची पडताळणी केलेनुसार पदभरती करावयाच्या एकुण 284 पदांची शिल्लक अनुशेषाप्रमाणे आरक्षण वरील रकाना क्रमांक 4 मध्ये संख्या नमुद केलेली आहे.
2. एकुण 284 पदांपैकी दिव्यांगासाठी 11 पदे व अनाथ संवर्गासाठी 2 पदे आरक्षित असुन सदरची पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.

- **टीप :** 1) वरील राखीय/बिनराखीव तसेच एकूण पदांच्या संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. समांतर आरक्षणाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील अन्य पात्र उमेदवारांची निवड करुन पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.
2) वर नमूद रिक्त पदांपैकी 11 पदे ही शासन नियमानुसार दिव्यांगांच्या खालील प्रवर्गासाठी प्रत्येक गटासाठी पुढील प्रमाणे पदे आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.
3) वर नमूद रिक्त पदांपैकी 02 पदे ही शासन नियमानुसार अनाथ प्रवर्गासाठी आरक्षित असून सदर पदे सामाजिक आरक्षणाचा विचार न करता भरली जातील.
(अ) अंध/अल्पदृष्टी (B, LV) (Blind/Low vision): **3 पदे** (1%)
(ब) कर्णबधिरता अथवा ऐकू येण्यातील दुर्बलता (D-HH Deaf Hard of Hearing): **3 पदे** (1%)
(क) अस्थीव्यंगता (OL, OAL,) / मेंदूचा पक्षघात (CP-Cerebral Palsy) / कुष्ठरोग मुक्त (LC-Leprasy cured) / शारीरिक वाढ खुंटणे (DW-Dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (AAV - Acid Attack Victims): **3 पदे** (1%)
(ड) स्वमग्नता (Autism) / मंद बुध्दी किंवा आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/ विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability) / मानसिक आजार (Mental Iliness): **1 पद**
(इ) वरील अ ते ड मधील बहिरेपणा व अंधत्वासह एकापेक्षा जास्त प्रकारचे दिव्यांगत्व असणाऱ्यासाठी त्यांचे सुनिश्चित करण्यात आलेल्या पदावर
(MD- Multiple Disabilities): **1 पद**
- **अनाथ- 2 पदे**

**सेवा प्रवेशानुसार आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता :-**

| पद | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|
| शिपाई (गट-ड) | माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण |

**उक्त पदासाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक आहे.**

- **वयोमर्यादा :-**

1) उक्त पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज करण्याच्या दिनांकास किमान वय 18 वर्षे पूर्ण असावे व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी/खेळाडूंसाठी/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा 05 वर्षे शिथिलक्षम राहील. तसेच भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील.)

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही 2015/प्र.क्र.404/कार्या-12, दिनांक 29.05.2019 अन्वये दिव्यांग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा 45 वर्षे इतकी राहील.

शासन निर्णय क्र. मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ.दि.20.08.2010 मधील तरतुदीनुसार माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत विहीत वयोमर्यादेतील सूट ही त्यांचा सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील.

2) मागासवर्गीय उमेदवार, दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त आणि खेळाडू यांना असलेली वयोमर्यादेतील शिथिलतेबाबतची कोणतीही अधिकतम असलेली एकच सवलत देय राहील.

- **परीक्षा शुल्क :-**

| पदनाम | अराखीव (खुला) प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| शिपाई (गट-ड) | रु.1,000/- | रु 9,00/- |

- **उपरोक्त परीक्षा शुल्काव्यतिरिक्त बँक चार्जेस तसेच त्यावरील देय कर अतिरिक्त असतील.**
- **माजी सैनिकांसाठी परीक्षाशुल्क आकारले जाणार नाही.**

- प्रस्तुत जाहिरातीमध्ये पदभरती संदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पद्धत, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या इ. बाबतचा तपशिल याबाबत https://rfd.maharashtra.gov.in आणि https://igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळांवरील सर्वसाधारण सूचना मध्ये लिंक प्रसिध्द करतेवळी उपलब्ध करुन देण्यात येईल.
- भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व बाबी, त्यात होणारे बदल, सूचना इत्यादी या https://rfd.maharashtra.gov.in आणि https://igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येतील. याबाबत उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावरुन माहिती उपलब्ध करून घेण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.
- होणारी स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही.

**दिनांक: 21/04/2025**
**ठिकाण :- पुणे.**

**स्वा/-**
**रवींद्र बिनवडे (भा.प्र.से)**
**अध्यक्ष, राज्यस्तरीय निवड समिती, पुणे (गट-ड)**
**तथा नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

[DGIPR-2025-26/ क्र.5/C-308]